Jagdamba Education Society's

# Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 11/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**


आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या…

आपलं महानगर | My महानगर.com

www.mymahanagar.com

# दिनविशेष

## कादंबरीकार, कथालेखक नारायण हरी आपटे



नारायण हरी आपटे हे मराठी कादंबरीकार, व्याख्याते आणि प्रकाशक होते. त्यांचा जन्म ११ जुलै १८८९ रोजी सांगली जिल्ह्यातील समडोळी येथे झाला. त्यांचे शिक्षण समडोळीला आणि नंतर सातारा येथे झाले. नारायण हरी आपटे यांनी मुख्यत: कादंबऱ्या लिहिल्या असल्या, तरी त्यांच्या लघुकथासंग्रह आणि वैचारिक लेखनही प्रकाशित झाले आहे. त्यांनी जवळपास साठ कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांतल्या थोड्याशा ऐतिहासिक सोडल्या तर बाकीच्या सामाजिक कादंबऱ्या आहेत. त्यांची एकूण साहित्य-ग्रंथ संख्या सुमारे १०० इतकी आहे. इंग्रजांची परकीय नोकरी करावयाची नाही अशी हिंमत बाळगून केवळ लिखाण करून संसार करणारे ते काही लेखकांपैकी एक होत.

आपटे हे 'किर्लोस्कर खबर' या नियतकालिकाचे काही काळ सहसंपादक होते. साताऱ्यातून ते आल्हाद साप्ताहिक प्रसिद्ध काढत. कोरेगावहून त्यांचे स्वत:चे 'मधुकर' नावाचे मासिक प्रसिद्ध होत असे. न पटणारी गोष्ट (१९२३), सुखाचा मूलमंत्र (१९२४), पहाटेपूर्वीचा काळोख (१९२६), उमज पडेल तर (१९३९), एकटी (१९४५) या आपट्यांच्या काही प्रसिद्ध सामाजिक कादंबऱ्या होत. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यापैकी अजिंक्यतारा (१९०९), संधिकाल (१९२२), लांच्छित चंद्रमा (१९२५) आणि रजपूतांचा भीष्म (१९४९) या विशेष उल्लेखनीय आहेत. आराम-विराम (१९३४) आणि बनारसी बोरे हे त्यांचे कथासंग्रह. यांशिवाय गृहसौख्य (१९३१), आयुष्याचा पाया (१९४६), कुर्यात् सदा मंगलम् (१९४९) यांसारख्या ग्रंथांतून संसारसुखाचे मूलभूत सिद्धान्त, वैवाहिक नीती, तरुण विद्यार्थ्यांचे आदर्श वर्तन इ. विषयांसंबंधी विवेचन त्यांनी केले आहे. १९६२ सालच्या सातारा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे ना.ह.आपटे हे स्वागताध्यक्ष होते. नारायण हरी आपटे यांचे १४ नोव्हेंबर, १९७१ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jul 11, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401